# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 12/02/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

1946

क्र :पोअय/प्रलि/८०-सी/पोउपनि-मानकर /हजर/ /२०२० यवतमाळ, दिनांक 12 FEB 2020

**आदेश**

वार्षिक सर्वसाधारण बदल्या-२०१९ अंतर्गत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे आदेश क्र.अप/कक्ष-३/पोलीस अधिकारी-विनंती-२०२०/२६५९, दि.०६/०२/२०२० अन्वये पोलीसउप निरीक्षक, श्री.सत्यजित रमेश मानकर यांची अकोला जिल्हा ते यवतमाळ जिल्हा अशी त्यांचे विनंतीनुसार बदली करण्यात आलेली आहे. त्यांना अकोला जिल्हा येथून दि.०७/०२/२०२० रोजी म.नं.कार्यमुक्त करण्यात आले. पोउपनि/श्री.सत्यजित मानकर हे यवतमाळ जिल्हा येथे दिनांक१०/०२/२०२०रोजी म.नंतर कर्तव्यार्थ हजर झाले आहेत.

पोलीस उप निरीक्षक, श्री.सत्यजित रमेश मानकर, यांना यवतमाळ जिल्हा येथे कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत असून त्यांनी पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरुपात **जिल्हा विशेष शाखा**, यवतमाळ येथे कामकाज करावे.

12/02

**( नूरुल हसन भा.पो.से )**
**प्र.पोलीस अधीक्षक यवतमाळ.**

प्रति,

पोलीस उप निरीक्षक, श्री.सत्यजित रमेश मानकर , नियंत्रण कक्ष, यवतमाळ.

प्रत सविनय सादर :-

मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई (लक्षवेध-कार्यासन क्र.५)
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.

प्रतीलीपी :अ.पो.अ./नियंत्रण कक्ष अधिकारी/प्र.अधिकारी जि.वि.शाखा/लघुलेखक/पो.अ.वाचक शाखा/वेतन लिपीक-२/संगणक कक्ष /डिपीजी लिपिक

प्रत :-पोलीस अधीक्षक, अकोला यांना माहितीकरिता सस्नेह अग्रेषित.

क्रमांक:डिपी/३१-बी/पो.उप.नि.दिकोंडवार /संलग्न/ 1947 /२०२० यवतमाळ दि. 12 FEB 2020

आदेश

पो.उप.नि/दर्शन दिकोंडवार, नेमणुक पो.स्टे. अवधुतवाडी, यांनी कर्तव्यात केलेल्या कसुरी संबंधाने त्यांना पोलीस स्टेशन अवधुतवाडी, येथुन नियंत्रण कक्ष, यवतमाळ येथे पुढील आदेशापर्यंत संलग्न करण्यात येत आहे.

प्रभारी अधिकारी यांनी वर नमुद पोलीस अधिकारी यांना तात्काळ नियंत्रण कक्ष, यवतमाळ येथे हजर होणे कामी कार्यमुक्त करावे.

11.02

(नूरुल हसन) भा.पो.से
प्र.पोलीस अधिक्षक,यवतमाळ

प्रति,

प्रभारी अधिकारी, पो.स्टे. अवधुतवाडी/नियंत्रण कक्ष, यवतमाळ

प्रत - वेतन लिपीक-२/ अधिकारी आस्थापना लिपीक/डिपीज लिपीक/पो.उप.नि-दर्शन दिकोंडवार, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस.

1961

क्रमांक :- पोअय/सआली-1/कर्तव्यावर हजर-कर्मचारी/ /2020 यवतमाळ, दिनांक :- 12 FEB 2020

विषय :- हजर करुन घेणे बाबत

--- 000 ---

**सपोउपनि/122 सुरेश रामचंद्र बुरेवार नेणमुक बॉ.शो.ना.प.यवतमाळ हे दि.11/12/2019 ते** 12/02/2020 (64दिवस) सिक रजेवर होते. ते दिनांक 12/02/2020 रोजी कर्तव्यावर हजर होणे करीता आले असुन त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मधिल नियम (61) नुसार त्यांचा दिनांक 11/12/2019 ते 12/02/2020 पर्यंतचा सिक कालावधी खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

11/12/2019 ते 12/02/2020 परावर्तीत रजा 64दिवस

**(मा.अ.पो.अधि.यांचे आदेशान्वये)**

(पी.के.गिरोलीकर)
प्र.कार्यालय अधिक्षक,
पोलीस अधिक्षक यवतमाळ,करीता.

प्रति, प्रभारी अधिकारी :- बॉ.शो.ना.प.यवतमाळ

प्रत:- वेतन लिपीक 01/डिपीजी लिपीक यांना माहिती योग्य त्या कार्यवाहिस्तव

क्रमांक: पोअय/सआली -२/पोलीस कर्म/अर्जीत रजा /२०२०, 1923 यवतमाळ दिनांक :- 12 FEB 2020

# आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे यांना त्यांचे विनंती नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधिल नियम ५० अन्वये सन २०१९-२०२० करीता अर्जीत रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क. | पो.कर्म- नाव व पदनाम | नेमणुक | रजेचे कारण | मंजुर रजा |
|---|---|---|---|---|
| १ | पोशि/५५२ विकास गुरनुले | यवतमाळ ग्रामिण | धार्मिक कार्य | ३० दिवस |
| २ | पोहवा/९६२ संजय नागभिडकर | जि.वा.शाखा | धार्मिक कार्य | ३०दिवस |
| ३ | पोशि/६२२ धंनजय फरसुले | यवतमाळ शहर | घराचे बांधकाम | २० दिवस |
| ४ | मपोशि/९६९ अनुराधा नेहारे | पो. मुख्यालय | धार्मिक कार्य | १५ दिवस |
| ५ | पोशि/८०२ निरंजन खिरतकर | वणी | धार्मिक कार्य | ३० दिवस |
| ६ | सपोउपनि/५७४ श्रावण कोडापे | मसुविक यवतमाळ | धार्मिक कार्य | ३० दिवस |
| ७ | पोहवा/९४८ शंकर पारखी | मारेगाव | धार्मिक कार्य | ३० दिवस |

तसेच नमुद पोलीस कर्मचारी यांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पाहुन तसेच कामाची निकट पाहता आळीपाळीने रजेवर सोडावे व रजेवर सोडल्याच्या अनुपालन अहवाल या कार्यालयात संबंधीत लिपीक यांचेकडे सादर करावा

**( प्रदिप शिरस्कर )**
पोलीस उपअधिक्षक,(मुख्या.)
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ

**प्रति,**

पोलीस मुख्यालय ,यवतमाळ./यवतमाळ ग्रामिण /जि.वा.शाखा/यवतमाळ शहर / मसुविक यवतमाळ/वणी/मारेगाव

**प्रत माहितीस व कार्यवाहीस,**

डि पी जी लिपीक , आस्थापना शाखा.

क्रमांक : पोअय/सआली-4/रप्रस/गटवर्ष 2017-2020/ 1951 /2019 यवतमाळ दिनांक 12 FEB 2020

आदेश

खालील खालील नमुद पोलीस कर्मचारी यांनी त्यांचे कुटंबातील सदस्यासह त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे गट वर्ष 2017-2020 करीता मुख्यालय ते घोषीतत ठिकाण व परत अशी रजा प्रवास सवलत महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रप्रस/109/184/सेवा-5 दिनांक 28/05/1995 व शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-1000/प्र.क्र./70/सेवा-5 दिनांक 11.08.2000 अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1000/प्र.क्र./70/सेवा-5 दिनांक 10.02.2001 तरतुदीनुसार रजा प्रवास सवलत मंजुर करण्यात येत आहे.

सदर रजा प्रवास सवलतीमध्ये उपरोक्त नमुद शासन परिपत्रक संकीर्ण-1000/प्र.क्र./70/सेवा-5 दिनांक 10.02.2001 अन्वये हयात अपत्ये व पत्नी यांचा समावेश राहील.रजा प्रवास उपभोगल्यानंतर देयक सादर करतांना सार्वजनिक वाहन/रेल्वेची व एस.टी.ची तिकीटे पुराव्यादाखल सादर करावी.प्रवास जवळच्या मार्गाने व किफयतशिर दराने करण्यात यावा.तसेच रजा प्रवास सवलत उपभोगण्यासाठी पोलीस कर्मचाऱ्यास कोणत्या दिनांकास व कोणत्या रजेवर सोडले आहे.याबाबत या कार्यालयात कळविण्यात याव.रजा प्रवास देयकाचा खर्च -2055 पोलीस दल वेतन - 1 या लेखाशिर्षाखाली मंजुर असलेल्या अनुदानातुन भागविण्यात यावा.

| अ.क्र. | पो.कर्म.यांचे नाव पदनाम व ब.नं. | नेमणुक | प्रवास | | कुटुंबातील व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | कोठुन | कोठे | |
| 01 | पोना/1278 दत्ता पवार | उमरखेड | उमरखेड | गणपतीपुळे | 05 |
| 02 | मपोशि/1081 मेघा तायडे | शिरपूर | शिरपूर | सिंधुदुर्ग | 04 |
| 03 | पोहवा/1173 पुंडलिक वानखडे | दिग्रस | दिग्रस | सावंतवाडी | 03 |
| 04 | सपोउपनि/1497 नरहरी चंद्रे | पुसद ग्रा. | पुसद | गणपतीपुळे | 03 |
| 05 | मपोना/1965 शारदा | पुसद ग्रा. | पुसद | सावंतवाडी | 02 |
| 06 | पोना/1797 दिपक | पांएरकवडा | पांढरकवडा | सावंतवाडी | 04 |
| 07 | पोहवा/1817 शाम | पोफाळी | पोफाळी | गणपतीपुळे | 02 |
| 08 | पोशि/1613 रावसाहेब घोडे | जिवाशा | यवतमाळ | सावंतवाडी | 02 |
| 09 | पोना/1599 बलराम शुक्ला | पोमु . | यवतमाळ | सावंतवाडी | 04 |

मा.पोमसं.यांचे पत्र क्रमांक पोमसं/28-अ/4937/पो.कर्म.महा.दर्शन/184/2016 अन्वये पोलीस शिपाई ते सपोउपनि यांना महाराष्ट्र दर्शन प्रवास सवलतकरीता पोलीस कल्याण निधीतुन रू.1000/- एक हजार रूपये फक्त एकरकमी अनुदान मंजुर करून अदा करावे.

12.02

(नूरून हसन ) भापोसे

प्र.पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रती

वरील संबंधित कर्मचारी

प्रत : डीपीजी लीपीक/प्रवास भत्ता लि/रोखपाल/प्रभारी अधिकारी पो.कल्याण शाखा

क्रमांक :पोअय/आशा-4/बा.सं.रजा/मपोना-1942 सुजाता / 1952 /2020 यवतमाळ दिनांक 12 FEB 2020

आदेश

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक संकिर्ण-2017/प्र.क्र.25/सेवा-6 दिनांक 23.07.2018 चे शासन निर्णयानुसार खालील नमुद महीला पोलीस कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्या कालावधीकरीता त्यांच्या मुलगा/मुलीच्या संगोपनाकरीता विशेष बालसंगोपन रजा खालील अटी व शर्तिच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पो.कर्मचारी यांचे नाव पदनाम व ब.नं. | नेमणुक | अपत्यांची संख्या | रजा कोणत्या अपत्याकरीता | मंजुर बालसंगोपन रजा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | मपोना/1942 सुजाता सावळे | नेर | 01 | 01 | 26.02.2020 |

अटी व शर्ती :-

01) मुलांचे वय 18 वर्ष होईपर्यंत सदर रजा लागु राहील

02) एका वर्षामध्ये कमाल दोन महीण्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

03) पहील्या दोन जेष्ठतम हयात मुलाकरीता सदर रजा लागु राहील.

04) उपरोक्त महीला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाणाच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढेच रजा वेतन देण्यात येईल.

05) सदर कालावधीत रजा प्रवास सवलत अनुज्ञेय ठरणार नाही.

(मा.पोलीस अधिक्षक यांचे मान्यतेने)

12.02

(नूरूल हसन) भापोसे
प्र.पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रती

ठाणेदार पो.स्टे. नेर

प्रत : मपोना/1942 सुजाता सावळे ,मार्फत : ठाणेदार पो.स्टे. नेर

प्रत :राजपत्र लिपीक यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस

1922

क्रमांक :- पोअय/सआलि-1/अर्जीत रजा-पो.कर्मचारी-2019-2020 /2019 यवतमाळ, दिनांक :- 12 FEB 2020

**आ दे श**

खालील नमुद कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांची रजा,म.ना.सेवा (रजा) नियम 1981 मधील नियम 51 अन्वये सन **2019-2020** करिता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रामणे अर्जीत रजा मंजूर करण्यांत येत आहे.

| अ.क्र | पदनाम बन | नेमणूक | मागितलेली रजा व दिवस | कारण |
|---|---|---|---|---|
| ०१ | पोहवा/२९८अशोक आंबीलकर | यवतमाळ ग्रा. | १५ दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| ०२ | पोना/४५३ रफिक शेख | वंसतनगर पुसद | ३० दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| ०३ | नापोशि/४१४ बापुराव ठोकळे | पो.मु.यवत. | ३० दिवस | धार्मीक कार्याकरिता |
| ०४ | सपोउपनि/१३६६ विनोद मलमकार | यवतमाळ ग्रा. | ३०दिवस | मुलीच्या लग्नाकरिता |
| ०५ | पोहवा/२९२ रविंद्र जाधव | जि.वि.शाखा | ३०दिवस | धार्मीक कार्याकरिता |

नमुद पोलीस कर्मचारी यांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पाहुन त्यांनी तसेव कामाची निकट पाहुन आळीपाळीने रजेवर सोडल्याची तारीख न चूकता या कार्यालयास कळवावी.

(प्रदिप शिरस्कर)
प्र.पोलीस उप अधिक्षक (मुख्या)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ
करिता

प्रति,
ठाणेदार:-:पो.स्टे यवतमाळ ग्रामीन/वसंतनगर पुसद / जि.वि.शा./पो.मु.यवतमाळ

प्रत :- डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव.

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

# भाग ४ - बक्षिस / मानधन

निरंक

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

1917

क्रमांक:पोअय/डिपी/३१-बी-२/अ.आदेश/स.पो.नि./ 1917 /२०१९ यवतमाळ दिनांक : 01 FEB 2020

संदर्भ :- मा. वि.पो.म.नि यांचे आदेश क्र. अप कक्ष-५/यवतमाळ/अपिल/अं.आ/सपोनि-मालटे/७७/२०२०/५१९ अमरावती दि. ३१/०१/२०२०

विषय :- अपिल आदेशवर कार्यवाही होणेबाबत
स.पो.नि/शितल मालटे नेमणुक पो.स्टे. नेर.

***

संदर्भाकिंत विषयान्वये प्राप्त, स.पो.नि/शितल मालटे, यांचे अपिल आदेश पुढील कार्यवाहीकरीता या सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे.

सहपत्र : अपिल आदेश प्रत

(पी.के.गिरोलीकर )
प्र.कार्यालय अधिक्षक,
पोलीस अधिक्षक, यवतमाळ करीता.

**प्रति,**

अधिकारी आस्थापना लिपीक/डिपीजी लिपीक यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस्तव.

क्रमांक: अप/कक्ष-५/यवतमाळ/अपील/अं.आ/सपोनि-मालटे/७७/२०२० | 519

अमरावती दि. 31 JAN 2020

**वाचा :-** १) सपोनि/शितल एम. मालटे नेमणुक, पो.स्टे. पांढरकवडा जि. यवतमाळ यांचेविरुध्द करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीच्या कार्यवाहीची कागदपत्रे.

२) सपोनि/शितल एम. मालटे, यांना " **दोन वर्ष वेतनवाढ स्थगिती (परिणामकारक)** " ही शिक्षा याबाबत पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे आदेश क्र.डीपी/३१-बी २/सपोनि-मालटे /अं.आ./३८३/२०१८ दि. ०८.०१.२०१९ अन्वये दिली आहे.

३) वर नमुद शिक्षा आदेशाविरुध्द सपोनि/शितल एम. मालटे यांनी या कार्यालयाकडे सादर केलेला अपील अर्ज

--- ००० ---

**अपील आदेश**

सपोनि/शितल एम. मालटे नेमणुक, पो.स्टे. पांढरकवडा जि. यवतमाळ येथे नेमणुकीस असतांना त्यांनी केलेल्या खालील नमुद कसुरी बद्दल पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी प्राथमिक चौकशीची कार्यवाही करुन, " **दोन वर्ष वेतनवाढ स्थगिती (परिणामकारक)** " ही शिक्षा दिलेली आहे.

**कसुरी :-**

दिनांक ०७.०७.२०१८ चे १७.०० ते १९.०० वा. वे दरम्यान राबविण्यात आलेल्या नाकाबंदी दरम्यान प्रभारी अधिकारी यांनी स्वत: हजर राहणे बाबत आदेश असतांना सपोनि शितल मालटे हया नाकाबंदी डयुटी दरम्यान गैरहजर राहिल्या व वरिष्ठांचे आदेशाचे पालन केले नाही व आदेशाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले. प्रभारी अधिकारी म्हणुन योग्य रितीने कर्तव्य व जबाबदारी पार पाडले नाही.

अपीलार्थी यांचे उपरोक्त कसुरी संदर्भात अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे कडुन प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्यांनी उपरोक्त कसुरी केल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाल्याने त्यांना दोन वर्ष वेतनवाढ स्थगीत (परिणामकारक) हया प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. सदर कारणे दाखवा नोटीसचे संबंधाने अपीलार्थीने दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक वाटले नसल्याने पोलीस अधीक्षक, यवतमाळा यांनी प्रस्तावित शिक्षेचे अंतिम आदेश पारित करण्यात आले.

अपीलार्थी सपोनि/शितल एम. मालटे यांनी सदर शिक्षेच्या आदेशाविरुध्द या कार्यालयास उद्देशुन सादर केलेला अपील अर्ज मुदतीत असल्याने तो विचारार्थ घेण्यात आलेला आहे.

एंकदरीत सपोनि/शितल एम. मालटे नेमणुक, पो.स्टे. पांढरकवडा जि. यवतमाळ यांच्याविरुध्द करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशीच्या कार्यवाहीच्या कागदपत्रांची व अपील अर्जात त्यांनी उपस्थीत केलेल्या मुद्यांची व त्यावर पोलीस अधीक्षक यांनी सादर केलेल्या निराकरण टिपणीचे काळजीपुर्वक अवलोकन केले. तसेच अपीलार्थी यांना त्यांचे अपील संबंधाने समक्ष बाजु मांडण्यासाठी दि. २९.०१.२०२० रोजी बोलाविण्यात आले असता समक्ष केलेले कथन समाधानकारक व संयुक्तिक दिसुन आल्याने मी **मकरंद रानडे, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती** खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

06/02/20

**-: आदेश :-**

सपोनि/शितल एम. मालटे नेमणुक, पो.स्टे. पांढरकवडा जि. यवतमाळ त्यांचे आदेश क्र. .डीपी/३१-बी २/सपोनि-मालटे/अं.आ./३८३/२०१८ दि. ०८.०१.२०१९ अन्वये दिलेली **" दोन वर्ष वेतनवाढ स्थगिती (परिणामकारक) "** या शिक्षेत अंशत: बदल करुन त्याऐवजी **"सक्त ताकीद "** ही शिक्षा देण्यात येत आहे. तसेच भविष्यात त्यांच्याकडुन वरील कसुरीची पुनरावृत्ती होणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी.

सदर शिक्षेविरुध्द अपील अनुज्ञेय नाही.

**( मकरंद रानडे )**
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परिक्षेत्र, अमरावती

प्रति,

सपोनि/शितल एम. मालटे नेमणुक, पो.स्टे. पांढरकवडा जि. यवतमाळ.

प्रत व मार्फत:- पोलीस अधीक्षक, यवतमाळ

२/- कृपया वर नमुद आदेशाची मुळ प्रत अपचारी सपोनि/शितल एम. मालटे नेमणुक, पो.स्टे. पांढरकवडा जि. यवतमाळ यांना अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत या कार्यालयास सादर करावी.

३/- अपीलार्थी यांचे विरुध्दचे कार्यवाहीचे मुळ कागदपत्रे यासोबत जोडुन परत पाठविण्यात येत आहे ते मिळाल्याची पोच दयावी.

# भाग ६ - प्रशिक्षण व इतर

**निरंक**